# महाराष्ट्र शासन

शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगांव
तळ मजला, शासकीय महिला रुग्णालय इमारत,मोहाडी रोड, जळगांव.
ईमेल.ghmcjalgaon@gmail.com

जा.क्र.शाहोमवरुज/दरपत्रक पडदे/२०२३-२४/ २०९ दिनांक :20 JUN 2023

प्रति,

-------------

-------------

विषय :- या महाविद्यालय व रुग्णालयातील विभागांकरीता पडदे बसविणे करीता दरपत्रक मागविणे बाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय, शासकीय महिला रुग्णालय इमारत, मोहाडी रोड, जळगांव येथे कार्यालयाकरीता तसेच इतर विभागांकरीता खालील तपशीलाप्रमाणे पडदे बसवावयाचे आहे.

| अ.क्र. | साधन सामुग्रीचे नांव | शेरा |
|---|---|---|
| ०१ | खिडकीसाठी पडदे तयार करणे | 9x6 Ft Size 1" Standard GI Steel pipe with Bracket Cloth & Fiting Charges & all necessary is included |
| ०२ | दरवाजासाठी पडदे तयार करणे | 3.5x8 Ft Size 1" Standard GI Steel pipe with Bracket Cloth & Fiting Charges & all necessary is included |
| ०३ | कर्टन तयार करणे | 12x8 Ft Size Standard GI Steel pipe with Bracket Green Cloth & Fiting Charges & all necessary is included |

तरी आपले दरपत्रक सिलबंद पाकीटामध्ये विहित कालावधीत खालील नमूद अटी व शर्ती यांच्या अधिन तसेच सोबत जोडलेल्या यादीतील तपशीलाप्रमाणे राहून सादर करावे.

| अ.क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १ | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | दिनांक २०.०६-२०२३ ते ३०-०६-२०२३ (या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत, शासकीय व स्थानिक सुटटीचे दिवस वगळून ( सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ) |
| २ | दरपत्रक उद्यडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ०१.०७.२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. |
| ३ | दरत्रक उघडण्याचे ठिकाण | अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय आयुर्वेद होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय, तळ मजला, शासकीय महिला रुग्णालय इमारत, मोहाडी रोड, जळगांव. |

## अटी व शर्ती

१. दिनांक ३०.०६.२०२३ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. दरपत्रकाच्या पाकीटावर Quotation for curten असा उल्लेख करणे आवश्यक आहे.

३. दरपत्रकात कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा ओव्हररायटींग असता कामा नये. दरपत्रकामध्ये आवश्यक तेथे दिनांक व ठिकाण नमुद करावे.

४. पुरवठादाराने GST ची नोंदणी करणे आवश्यक राहील. तसेच दरपत्रके संस्थेची नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर दरपत्रक सुचनेनुसार विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील.

५. दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरीता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील. (हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे)



CamScanner

६. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रक धारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नसावा. तसे आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

७. **दरपत्रकासोबत GST नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड व शॉप अॅक्ट परवाना नुतनी करणासहीत साक्षांकित झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक राहील.**

८. देयकाच्या रकमेतुन शासन नियमातील तरतुदीनुसार GST/ Income Tax कपात करण्यात येईल. सदर टॅक्स मधुन सुट अनुज्ञेय असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

९. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंपनीच्या एका प्रतिनिधीस स्वखर्चाने हजर राहण्याची मुभा राहील.

१०. दरपत्रकानुसार मंजुर करण्यात आलेल्या दराव्यतिरिक्त इतर कोणतेही दर देय होणार नाहीत.

११. पुरवठा करण्यात येणारी वस्तु संस्थेस पोहोच करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. त्यासाठी कोणतेही अतिरक्त शुल्क अदा केले जाणार नाही. तसेच पडदयांचे रंग निवडण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

१२. शा.निर्णन उद्योग व उर्जा विभाग दि.०१.१२.२०१६ मध्ये नमूद केल्यानुसार पुरवठादाराच्या बाबतीत खरेदीच्या कोणत्याही टप्यावर अनियमितता /गैरप्रकार/नैतिक अध:पतन इतरही बाबी निदर्शनास आल्यास त्याबाबत शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३. यशस्वी दरपत्रक धारकासपुरवठा आदेश निर्गमित झाल्यानंतर २ जारतीत जास्त दोन दिवसामध्ये कामाला सुरवात करावी लागेल तसेच सदर कामाकरीता वापरण्यात येणारे साहित्य उत्तम दर्जाचे असावे.

१४. आपल्या देयकांची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांचे बँक खात्यात जमा करण्यासाठी विहित नमुन्यातील राष्ट्रीयकृत बँक खाते प्रमाणीकरण प्रपत्र, पॅनकार्ड झेरॉक्स प्रत व रद्द केलेला धनादेश इ. देणे आवश्यक राहील. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा करणे शक्य होणार नाही.

१५. अधिष्ठाता, शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव हे सदर दर पत्रक स्विकारणे, रद्दकरणे, यशस्वी दरपत्रक स्विकारणाच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखिल कोणत्याही वेळी रदद करण्याचे अधिकार तसेच खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.

१६. यशस्वी दरपत्रक धारकास वस्तुंचा पुरवठा स्व:खर्चाने या संस्थेपर्यत करावा लागेल तसेच वस्तु मध्ये तुटफुट किंवा गहाळ झाल्यास वस्तुंचा स्विकार केल्या जाणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहिल.

१७. ज्या वस्तुंची किंवा सामग्रीचे दरपत्रक सादर करण्यात येत आहे ती वस्तु ISI चिन्हांकित असवी.

१८. या कार्यालयाचे दरपत्रक सुचनेमध्ये दिलेल्या यादीतील तपशीलाप्रमाणे दरपत्रक सादर करणे अनिवार्य आहे.

१९. दरपत्रक सादर करण्यापुर्वी प्रत्यक्ष कामांची पाहणी करुनच दरपत्रक सादर करावे.

अधिष्ठाता
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय जळगांव.

दरपत्रकासोबत जोडावयाचे कागदपत्रे

१) GST नोंदणी प्रमाणपत्र
२) पॅन कार्ड
३) शॉप अॅक्ट परवाना किंवा ड्रग्स परवाना नुतनीकरणासह
४)हमीपत्र -१ व हमीपत्र -२
५)Annexure -B

## Annexure - B

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय रुग्णालय, जळगांव.

| अ.क्र. | तपशिल | आवश्यक माहिती वा प्रमाणपत्रे जोडण्यात आलेली आहेत किंवा कसे |
|---|---|---|
| १ | पुरवठादाराचे नाव | |
| २ | कंपनीचा पत्ता,दुरध्वनी ई-मेल आयडीसहित | |
| ३ | कंपनीचा नोंदणी क्रमांक ( Registration No.) | |
| ४ | GST No. | |
| ५ | PAN No. | |
| ६ | शासनाचे /इतर कर | |
| ७ | सदर वस्तुंचा पुरवठा इतर शासकीय/निमशासकीय कार्यालयास केला असल्यास अशा कार्यालयाचे पत्ते व दुरध्वनी क्र. अथवा पुरवठा आदेशांची छायांकित प्रत | |
| ८ | हमी पत्र | |
| ९ | इतर अटी व शर्ती असल्यास | |

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित



CamScanner

## हमीपत्र -१ ( Undertaking )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव.

मी,............................ लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय,जळगांव येथील पडदे बसविणेकरीता राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी/खरेदी समिती वा कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबध/संघर्ष नाहीत तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

..........................................................................................................................

## हमीपत्र-२ ( Undertaking )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव.

मी ................................लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय,जळगांव येथील पडदे बसविणेकरीता राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्या-या अन्य संस्थांसोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध वा सहभाग नाही तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित



CamScanner